# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अतिमहत्त्वाचे/तातडीचे

जा.क्र.१०/एडीएम/पदविका/प्रवेश प्रक्रिया/२०१८-१९/ ७४०
दिनांक : 6 JUL 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई, पुणे

**विषय:- प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेतून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश वगळणेबाबत...**

संदर्भ:- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांची अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र. २५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.२५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन अधिसूचना व शासन निर्णयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनिमयन) अधिनियम २०१५ नुसार दि. १९ मे, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची 'क' (Schedule A) मधील व्यावसायिक पदविका पाठयक्रमापैकी अनुक्रमांक १ येथील 'अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका', अनुक्रमांक २ येथील 'औषधनिर्माणाशास्त्र पदविका' व अनुक्रमांक ३ येथील 'हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका' हे तीन व्यावसायिक अभ्यासक्रम दि. ०५.०७.२०१८ च्या संदर्भिय अधिसूचनेव्दारे / शासन निर्णयाव्दारे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्वरीत संदर्भासाठी अधिसूचना व शासन निर्णयाची प्रत सोबत जोडत आहे. तसेच या पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत जाण्यापुर्वी तंत्रशिक्षण संचालनालयामाफ्रत या पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशासाठी जी कार्यपध्दती उपयोगात आणण्यात येत होती सर्वसाधारणपणे तशीच कार्यपध्दती शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता व त्यापुढे अवलंबविण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयाने करावी, असे संदर्भिय शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे.

दि. ०५.०७.२०१८ रोजी संदर्भिय अधिसूचना प्रसिध्द झाल्यामुळे विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेतुन संदर्भिय अधिसूचनेच्या दिनांकापासुन वगळण्यात आली असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता पदविका अभ्यासक्रमाची सुरु केलेली प्रवेश प्रक्रिया संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत पुढे चालु ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे पदविका प्रवेश प्रक्रियेचे नियंत्रण करण्याची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहणार आहे.

तसेच येथे असे ही आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य नव्हते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता प्रवेश नियामक प्राधिकरणाने सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश अर्ज करतांना जात वैधता प्रमाणपत्र असणे अनिवार्य केले होते. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदविका प्रवेश प्रक्रियेकरिता तातडीने जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येत असल्यामुळे, **विद्यार्थ्यांच्या अडचणी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन वर नमुद अधिसूचना / शासन निर्णयामधील तरतुदीनुसार संचालनालयाच्या स्तरावरुन पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरिता जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.** तसेच त्याअनुषंगाने

खालीलप्रमाणे कार्यवाहीकरीता संबंधित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था /सुविधा केंद्र (F.C.)/प्रवेश निश्चिती केंद्र (ARC)/पालक/विद्यार्थी यांना आपल्यामार्फत सुचनां देण्यात याव्यात.

१. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी, थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी यापुर्वी अधिसूचनेमध्ये नमुद केल्यानुसार राखीव जागांवरील प्रवेशासाठी विहित केलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. **प्रवेश प्रक्रियेकरीता जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.** तथापी, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार विहित कालावधीत सादर करणे अनिवार्य आहे.

२. उपरोक्त नमुद प्रवेश प्रक्रियेकरिता यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रवेशांच्या वेळापत्रकामध्ये (Schedule) कोणताही बदल राहणार नाही.

३. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रा अभावी खुल्या प्रवर्गात ऑनलाईन अर्ज भरलेला आहे, त्या विद्यार्थ्यांनी सुविधा केंद्रावर जाऊन जात प्रमाणपत्राच्या / नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे राखीव प्रवर्गातुन अर्ज करण्याकरिता आवश्यक ते बदल करण्याची कार्यवाही प्रथम प्राधान्याने प्रसिध्द केलेल्या प्रवेशांच्या वेळापत्रकानुसार (Schedule) विहित कालावधीत पुर्ण करावी.

४. संबंधित सुविधा केंद्रानी अशा प्रकारचे विद्यार्थी सुविधा केंद्रावर आल्यानंतर त्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

५. ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र /जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावती अभावी अद्यापपर्यंत पदविका प्रवेश प्रक्रियेकरिता ऑनलाईन अर्ज केला नसल्यास सदर विद्यार्थ्यानी प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार विहित कालावधीत ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

६. उपरोक्त नमुद पदविका प्रवेश प्रक्रियेच्या कार्यवाहीकरीता संबंधितांनी पत्रव्यवहार संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडे करण्यात यावा.

वरील अधिसूचना व शासन निर्णय सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविकाच्या अभ्यासक्रमातील प्राचार्य/संचालक, विद्यार्थी, पालक यांच्या निदर्शनास आणण्याकरिता आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
२) मा. आयुक्त, राज्य समाईक प्रवेश परिक्षा कक्ष, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, फोर्ट, मुंबई -१
३) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, फोर्ट, मुंबई -१

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

१) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२) कार्यासन क्रमांक २ व २ अ, मुख्य कार्यालय, मुंबई
३) प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.
४) संबधित सुविधा केंद्र (F.C.)/प्रवेश निश्चिती केंद्र (ARC)/पालक/विद्यार्थी
५) निवड नस्ती